मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन, सहावा मजला,
नवी मुंबई - 400 614.
दिनांक 14 NOV 2002

कार्यालयीन आदेश क्रमांक. ३४ दिनांक : १२/११/२००२

विषय :- नगरपरिषद लेखा परीक्षणाबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक स्था. 18/ब/सभा/एएसए/1247
दिनांक 29/10/2002.

दिनांक 18/9/2002 रोजी कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या स्थानिक निधी लेखा विभागाच्या विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांच्या बैठकीमधील विषय क्रमांक 9 वरील चर्चेनंतर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

1. ज्या नगरपालीकांचे सन 2000-01 पर्यंत लेखा परीक्षण पूर्ण झालेले आहे मात्र अद्याप लेखा परीक्षण अहवाल निर्गमित झालेले नाहीत अशा नगरपालीकांचे लेखा परीक्षण अहवाल त्वरीत निर्गमित करण्यात यावेत.
2. यापुढे नगरपालिकांचे लेखा परीक्षण अद्ययावत राहील याची सर्व उपमुख्य लेखा परीक्षक यांनी खबरदारी घ्यावी. यासाठी त्यांनी जिल्हा परिषद लेखा परीक्षण पूर्ण होताच नगरपालिकांचे लेखा परीक्षण हाती घ्यावे आणि हे लेखा परीक्षण दिनांक 31/1/2003 पर्यंत पूर्ण करावे आणि लेखा परीक्षण अहवाल दिनांक 28/3/2003 पूर्वी निर्गमित करावेत.
3. नगरपालीका लेखा परीक्षण पूर्ण झालेवर आवश्यक तेवढा कर्मचारीवृंद इतर संकिर्ण संस्थांचे लेखा परीक्षणासाठी ठेवून इतर लेखा परीक्षकांची सेवा ग्रामपंचायत विभागाकडील लेखा परीक्षणासाठी वापरावी.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
नवी मुंबई.

प्रत : माहितीस्तव व पुढील सस्नेह कार्यवाही साठी अग्रेषित.
1. उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा.
2. उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,
3. उपमुख्य लेखा परीक्षक (अहवाल/पं.रा.स./प्रशासन)
4. लेखा परीक्षा अधिकारी (प.रा.स./कृषि विद्यापीठे)
5. सहाय्यक लेखा परीक्षा अधिकारी (अहवाल/प.रा.स.)
6. सहाय्यक अधिक्षक ,अहवाल शाखा
7. उच्चस्तर लिपिक 1/2/3/4
8. अभिलेखापाल (... नती)